**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे,**

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय, राजगुरूनगर

ता. खेड, जि. पुणे- 410 505

(शैक्षणिक वर्ष 2021 - 2022 पासून)

वर्ग:- तृतीय वर्ष वाणिज्य शाखा (T.Y.B.Com.)

विषय:- भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास-I

सेमिस्टर :- V

मार्गदर्शक प्राध्यापक

डॉ. उमेश भोकसे

## प्रकरण दुसरे

## २. भारतातील कृषी क्षेत्राचा विकास

प्रस्तावना:-

भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारताने मोठ्या प्रमाणात विकास केलेला असून देखील कृषी क्षेत्राचे महत्व आजही दिसून येते. भारतीय अर्थव्यवस्थाही मोठ्या प्रमाणावर कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. देशातील जवळ जवळ ७० टक्के लोक शेती क्षेत्रामध्ये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या अवलंबून आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे स्थान महत्त्वाचे आहे. शेती क्षेत्राचे विकासाशिवाय भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास पडून येणे शक्य नाही. मात्र, भारतीय शेतीचे निसर्गावर असलेले अल्प उत्पादकता, शेतीचे निम-व्यापारी स्वरूप यासारख्या कारणांमुळे आर्थिक विकासात शेतीक्षेत्र पुरेशा प्रमाणात योगदान देत नसल्याचे दिसून येत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेतील शेती क्षेत्राचे महत्व लक्षात घेऊन शेती क्षेत्राच्या प्रगतीसाठी उपाय योजना करण्यात आल्या. स्वातंत्र्यानंतर नियोजन काळात संस्थात्मक व तांत्रिक सुधारणांवर भर देण्यात आला त्यामुळे शेती क्षेत्रात वृद्धि घडून आली, भारतामध्ये सरकारने विविध प्रकारच्या पंचवार्षिक योजनांच्या आधारे शेती क्षेत्रावर लक्ष केंद्रित करून वेगवेगळ्या उपाययोजना राबवल्याने शेती क्षेत्रात प्रगती घडून येण्यास मदत झाली. हरित क्रांतीमुळे देशातील काही भागात मोठ्या प्रमाणात शेती क्षेत्रात भरभराटी झाली. शेती क्षेत्रातील उत्पादन हे राष्ट्रीय विकासासाठी आवश्यक आहे. अन्नधान्याचा पुरवठा हा शेती क्षेत्रामधून केला जातो तसेच मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती ही शेती क्षेत्र करते. तसेच उद्योगासाठी लागणारा

कच्चामाल शेती क्षेत्रातून प्राप्त होतो. त्यामुळे शेती क्षेत्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे. विकसित देशाच्या सुरुवातीच्या आर्थिक विकासामध्ये शेतीक्षेत्राचा मोठा वाटा आहे.

भारतासारख्या अल्पविकसित राष्ट्रांचा आर्थिक विकास हा कृषी क्षेत्राच्या विकासावर अवलंबून आहे. भारतात नैसर्गिक संसाधने प्रचंड प्रमाणात उपलब्ध असली तरी भांडवलाच्या कमतरतेमुळे औद्योगिकरणाचा वेग अल्प आहे. परिणामी भारतीय लोकसंख्येला रोजगार उपलब्ध करून देण्याचे काम कृषी क्षेत्राने केले आहे. देशातील श्रमिकांना कृषी व कृषी आधारित उद्योगात रोजगाराची उपलब्धता होत असते, देशातील बेकारीचे प्रमाण कमी करण्यात कृषी क्षेत्राचा महत्त्वाचा वाटा आहे. भारतामध्ये भांडवलाची कमतरता मोठ्या प्रमाणात आहे. या भांडवलाच्या कमतरतेवर मात कृषीक्षेत्राच्या माध्यमातून करता येते. कारण कृषी क्षेत्रात भांडवल उत्पादन गुणोत्तर कमी असते व त्यामुळे कमी भांडवल गुंतवणूक मोठ्या प्रमाणात उत्पादन मिळवता येते. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात विदेशी चलनाची आवश्यकताही औद्योगिक क्षेत्र एवढी असत नाही. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून भारताचा आर्थिक विकास घडवून आणताना औद्योगिक क्षेत्राबरोबरच कृषी क्षेत्राला महत्त्वाचे स्थान पंचवार्षिक योजनांमध्ये दिले आहे. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये कृषी क्षेत्राची प्रगती झालेली आढळते

या प्रकरणामध्ये आपण भारतीय शेती अर्धव्यवस्थेतील स्थान आणि भूमिका, स्वातंत्र्यानंतर भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्राची प्रगती, भारतीय शेतीची अल्प उत्पादकतेची कारणे आणि उत्पादकता सुधारण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना करता येवू शकता, पाहणार आहोत. आज बरोबर भारतातील कृषी वित्त पुरवठयाची गरज आणि कृषी वित्तपुरवठा करणारे बिगर संस्थात्मक स्रोत आणि संस्थात्मक स्रोत यांचा अभ्यास करणार आहोत भारतीय कृषी विपणनातील दोष आणि ते दोष कमी करण्यासाठी केला जाणारा उपाययोजना यांचा आढावा घेणार आहोत, भारत सरकारने जारी केलेला नवीन कृषी कायदे, २०२० अभ्यासणार आहोत. शेतीच्या विविध प्रकारांपैकी सेंद्रिय शेती आणि करार शेती या दोन शेती पद्धतींचा अभ्यास आपण या प्रकरणात करणार आहोत.

२.३.१ भारतीय शेतीची भूमिका:-

भारतासारख्या कृषीप्रधान अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने शेती व्यवसायाचे महत्त्व खूप मोठे आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्याच्यात नियोजन काळात औद्योगिक क्षेत्राचे मोठ्या प्रमाणात प्रगती घडून आले असले तरी शेती क्षेत्राचे महत्त्व कमी झालेले नाहीत. देशातील ५० ते ६० टक्क्यांच्या आसपास काम करणाऱ्यांना रोजगार उपलब्ध करून देणारे हे क्षेत्र देशाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. देशाच्या आर्थिक विकासासाठी शेतीची भूमिका व महत्व आपणास पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

१. अन्नधान्य व कच्च्या मालाचा पुरवठा

मानवाच्या दैनंदिन जीवनातील सर्वांत मोठी अन्नधान्याची गरज भागविण्याचे काम शेती क्षेत्र करते. वाढत्या लोकसंख्येबरोबर अन्नधान्याची वाढती गरज भागविण्याचे काम शेती क्षेत्रातून केले जाते, वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ करणे आवश्यक असते या दृष्टीने शेतीचे महत्त्व जास्त असते. त्याचबरोबर उद्योग समूहासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठा ही शेती क्षेत्रातून केला जातो. तेलबिया,

साखर, कापड इत्यादी ग्राहक उत्पादनाला आवश्यक तो कच्चामाल शेतीतून उपलब्ध होतो. त्यामुळे औद्योगीकरणाच्या दृष्टीने शेती क्षेत्राला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे.

२. मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती

भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे महत्व यामुळे आहे की फार मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती या क्षेत्रात होते. साधारणपणे एकूण श्रमशक्ती पैकी ६५ टक्के श्रमशक्ती ही शेती क्षेत्रात कार्यरत आहे. एवढ्या मोठ्या श्रमशक्ती ला रोजगार संधी उपलब्ध करून देणारे हे क्षेत्र म्हणून शेतीक्षेत्र महत्त्वाचे आहे. विकसित देशाचा विचार करता फार कमी लोकसंख्या शेती क्षेत्रात गुंतलेली असते परंतु भारतामध्ये फार मोठ्या प्रमाणात लोक शेती क्षेत्रात काम करतात. अर्थात त्यामुळे छुपी बेकारी वाढते शेती क्षेत्रात उत्पादन व उत्पादकता यात वाढ झाल्यामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात.

३. औद्योगिक करण्यास मदत

शेती व्यवसाय प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे औद्योगिक क्षेत्राचा विकासास मदत करतो. साखर, कापड, ताग यांसारख्या महत्त्वपूर्ण उद्योगांना कच्चामाल उपलब्ध करून त्यांचा विकास साधण्याचे काम शेतीक्षेत्र करते. तसेच शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे उत्पन्नात वाढ झाल्यास त्यांची औद्योगिक क्षेत्रात उत्पादित होणाऱ्या वस्तू व सेवांची मागणी वाढते. त्यातून औद्योगिक क्षेत्रात उत्पादन वाढीला मदत होते. शेती क्षेत्राच्या प्रगतीबरोबरच आधुनिकीकरणाच्या प्रगतीला गती मिळते त्यातून यंत्रे, अवजारे, खते, कीटकनाशके यांची मागणी वाढते व त्यामुळे औद्योगिक उत्पादन वाढीला गती मिळते. अशा प्रकारे शेती क्षेत्रामुळे देशातील औद्योगिकीकरणास करण्यास मदत होते.

४. राष्ट्रीय उत्पन्नात मोठा वाटा

भारतीय अर्थव्यवस्थेत शेती व्यवसायाचे स्थान महत्त्वाचे आहे कारण या क्षेत्राकडून राष्ट्रीय उत्पन्नात पडणारी भर मोठी आहे. स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्रीय उत्पन्नातील शेती क्षेत्राचा वाटा कमी झालेला असला तरी आजही हा घाटा खूप मोठा आहे. १९५०-५१ मध्ये भारतातील राष्ट्रीय उत्पन्नात शेती क्षेत्राचा वाटा ५५.४ टक्के होता. तर २०२०-२१ मध्ये तो १९.४ टक्के होता. याचाच अर्थ राष्ट्रीय उत्पन्नात शेती क्षेत्राचा वाटा नियोजन काळात कमी झालेला असला तरी अजूनही तो फार मोठा आहे. विकसित देशांची तुलना करता राष्ट्रीय उत्पन्नातील हा वाटा खूपच मोठा असल्याचे दिसते.

५. सेवा क्षेत्राच्या विकासात मदत

शेती व्यवसायाचे वाहतूक, दळणवळण, वित्तपुरवठा वगैरे सेवा क्षेत्राच्या विकासात सहाय्य होते. शेतीक्षेत्राच्या प्रगतीबरोबरच शेतमालाचे उत्पादन वाढते, हा उत्पादित शेतमाल बाजारात पाठविण्यासाठी कार्यक्षम वाहतूक व्यवस्था आवश्यक असते. त्याचबरोबर माहितीची देवाणघेवाण करण्यासाठी दळणवळण व्यवस्थेचे आवश्यकता असते. वाहतूक व दळणवळणाच्या साधनाव्यतिरिक्त वित्तपुरवठाच्या साधनांमुळे अतिरिक्त वित्तपुरवठा गरजांची पूर्तता आवश्यक असते. अशा प्रकारे वाहतूक, दळणवळण, बँक व्यवसाय यासारख्या क्षेत्राच्या प्रगतीला मदत होते.

६. आंतरराष्ट्रीय व्यापारात महत्त्वपूर्ण भूमिका

आंतरराष्ट्रीय व्यापाराचे क्षेत्र पार पाडत असलेल्या भूमिकेमुळे भारतीय अर्थव्यवस्थेचे शेती व्यवसायाला महत्त्व आहे. भारतातून चहा, साखर, तेलबिया, तंबाखू व मसाल्याचे पदार्थ यांसारख्या वस्तूंची निर्यात केले जाते. भारताच्या एकूण निर्यातीत शेतमालाचा वाटा मोठा आहे. तसेच प्रक्रिया केलेल्या शेतमालाला

उदाहरणार्थं कापड, साखर यांचा वाटाही मोठा आहे. निर्यात शेती व्यवसायाचा वाटा मोठा असल्याने देशात शेतीक्षेत्र महत्वाच्या आहेत. आर्थिक विकासाच्या दृष्टीने हे क्षेत्र महत्त्वाचे आहे. यंत्रे, कच्चामाल अशा आर्थिक विकासाच्या दृष्टीने कराव्या लागणाऱ्या आयातीसाठी आवश्यक असणारे परकीय चलन शेतमालाच्या निर्यातीतून उपलब्ध होते.

७. सार्वजनिक आवख्यात महत्त्वाचे स्थान

सर्वजनिक अव्यात म्हणजे सरकारकडे जमा होणाऱ्या उत्पन्नातून सरकारी खर्चात शेती व्यवसायाचे महत्त्वाचे स्थान आहे. जमीन महसुलाच्या रुपाने सरकारला उत्पन्न मिळते. एकूण उत्पन्नात जमीन महसूलपासून मिळणाच्या उत्पन्नाचे प्रमाण कमी असले तरी ते महत्त्वाचे आहे. मात्र सरकार कडून केल्या जाणाऱ्या अंदाजपत्रके खर्चात शेती विकासासाठी करण्यात येणाऱ्या खर्चाचे प्रमाण खूप मोठे आहे. जलसिंचन सुविधा, साठवण व्यवस्था वगैरे साठी मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक खर्च केला जातो.

८. आर्थिक विकासास मदत

शेती व्यवसायाचा विकास झाल्यास त्यामुळे देशाच्या आर्थिक विकास मदत होते, शेतीच्या प्रगतीमुळे उद्योगधंद्यांसाठी आवश्यक असलेला ऊस, कापुस यासारख्या कच्चामाल उपलब्ध होऊन उद्योगांच्या प्रगतीस मदत होते. तसेच खते, कीटकनाशके, शेतीसाठी आवश्यक यंत्रे यांची शेतकऱ्यांकडून होणारी मागणी वाढल्यामुळे या उद्योगाच्या विकासास मदत होते. तसेच वाहतूक, दळणवळण, वित्तपुरवठा वगैरे क्षेत्रांचा विकासास आणि यातून देशाचा आर्थिक विकास होण्यास मदत होते.

९. ग्रामीण लोकांच्या राहणीमानात सुधारणा

ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान शेतीवर अवलंबून असते. ग्रामीण भागातील शेतकरी, छोटे व्यावसायिक यांच्या उत्पन्न शेतीवर अवलंबून असते, शेतीचा विकास घडून आल्यास शेतीवर अवलंबून असणाऱ्याच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांच्या राहणीमानात सुधारणा घडून येते.

''भारतीय शेतीची प्रगती :

सुरुवातीच्या फाळापासून भारतामध्ये शेती क्षेत्रास अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. भारत हा एक जगामध्ये कृषिप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखला जाणारा देश असून भारतातील ५० ते ६० टक्के लोकसंख्या ही कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. भारतीय शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने शेती क्षेत्राची हवी तेवढी प्रगती झालेली आढळून येत नाही ही त्यामुळे शेतीची उत्पादकता आढळते. उद्योगधंद्यांना लागणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठा हा शेती क्षेत्रातून होतो त्यामुळे बऱ्यापैकी करी शेतीवर अवलंबून असल्याचे दिसते. पंचवार्षिक योजना काळात शेती क्षेत्राच्या विकासासाठी शासनाने विविध पातळ्यांवर प्रयत्न केले आहेत. तसेच सन १९९१ च्या आर्थिक सुधारणा कालखंडानंतर शेती क्षेत्राच्या विकासाला चालना मिळाली.

पंचवार्षिक योजना काळातील भारतीय शेतीची प्रगती :

स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारताच्या शेती क्षेत्राचे अवस्था फार गंभीर होती. शेतकरी वर्ग हा मोठ्या प्रमाणात कर्जबाजारी झालेला होता. त्योच शेतकऱ्यांमध्ये असणारी क्षिरता, अंधश्रद्धा, रुडी परंपरा यामुळे

शेतामध्ये कोणत्याही प्रकारचे नवीन तंत्रज्ञान, संशोधन घडून येत नव्हते. शेती प्रामुख्याने पावसाच्या पाण्यावर पूर्णपणे अवलंबून होती परिणामी शेतीची उत्पादकता फारच कमी होती अशा शेती क्षेत्रावर सुमारे ७० टक्के पेक्षा अधिक लोक हे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीत्या अवलंबून होते. देशाला मोठ्या प्रमाणात अन्नधान्याची इतर देशांकडून आयात करावी लागत होती. त्यामुळे भारत सरकारने अन्नधान्य उत्पादन करण्याच्या उद्देशाने पहिल्या पंचवार्षिक योजनेत पूर्णपणे कृषी विकासाला प्राधान्य दिले. यामध्ये कृषीच्या उत्पादनाबरोबरच कसेल त्याची जमीन, कुळ कायदा व कमाल जमीन धारणा कायदा अशा प्रकारचे जमीन सुधारणा कार्यक्रम राबविण्यात आले तसेच शेतीला उत्तर-पूर्व वित्त पुरवठा करण्यासाठी शासन सहकारी संस्था यांनी पुढाकार घेतला अशा प्रकारे विविध प्रकारचे उपक्रम राबवून शेती क्षेत्राचे प्रगती करण्यास सुरुवात झाली.

खालील तक्त्यामध्ये विविध पंचवार्षिक योजना काळात भारताच्या कृषी मधील प्रमुख पिकांच्या उत्पादनातील झालेली वाढ दिसून येते. सर्वच पिकांच्या उत्पादनात जवळपास चार पट वाढ झाली आहे तर कापूस उत्पादनात जवळ जवळ दहा पट वाढ झालेली आढळून येते.

तक्ता क्र. २.१: पंचवार्षिक योजना काळात भारतीय शेतीतील प्रमुख पीक उत्पादन उत्पादनातील वाढ
(आकडेवारी दशलक्ष टनमध्ये)

| योजना | अन्नधान्य | | तेलबिया | | ऊस | | कापूस | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य |
| पहिली | 62 | 67 | 6 | 6 | 63 | 60 | 4 | 4 |
| दुसरी | 81 | 80 | 8 | 7 | 78 | 104 | 7 | 5 |
| तिसरी | 100 | 72 | 10 | 6 | 100 | 127 | 7 | 5 |
| चौथी | 129 | 104 | 11 | 9 | 150 | 140 | 8 | 6 |
| पाचवी | 125 | 132 | 12 | 9 | 165 | 165 | 8 | 7 |
| सहावी | 154 | 146 | 11 | 13 | 170 | 170 | 9 | 9 |
| सातवी | 180 | 171 | 18 | 17 | 217 | 210 | 10 | 11 |
| आठवी | 210 | 199 | 23 | 25 | 175 | 277 | 14 | 14 |
| नववी | 234 | 211 | 30 | 21 | 336 | 300 | 16 | 10 |
| दहावी | 234 | 216 | 30 | 24 | 336 | 345 | 16 | 23 |
| अकरावी | 240 | 257 | 32 | 30 | 356 | 358 | 30 | 35 |
| बारावी | 265 | 256 | 24 | 32 | 355 | 258 | 36 | 42 |

संदर्भ: भारतीय अर्थव्यवस्था, एस. चंद्र प्रकाशन, नवी दिल्ली,

भारतीय शेतीच्या उत्पादकतेतील प्रगती :

भारतातील मोठ्या प्रमाणात लोकसंख्या शेती क्षेत्रावर अवलंबून असल्याने त्यातून मिळणारी उत्पादकता आणि मिळणारे उत्पादन यांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. सन १९५०-५१ ते २०१९-२० या कालखंडात देशाचा राष्ट्रीय उत्पन्नातील कृषी क्षेत्राचा वाटा हा ५५ टक्क्याहून १५ टक्क्यांपर्यंत कमी झाला असला तरी देशातील ६० टक्क्यांपेक्षा अधिक लोकसंख्येच्या उपजीविकेचे साधन शेती हेच आहे. पहिल्या

पंचवार्षिक योजनेत शेती क्षेत्रासाठी योजना खर्चाच्या ३१ टक्के रक्कम खर्च करण्यात आली तर अकराव्या योजनेत १८.८ टक्के रक्कम खर्च करण्यात आली. अलीकडील काळात कृषी क्षेत्रातील गुंतवणुकीत अपेक्षित वाढ झालेली दिसत नसल्याने त्याचा परिणाम कृषी उत्पादन उत्पादकतेवर झालेला आहे.

गहू व तांदूळ या दोन महत्त्वाच्या पिकांपासून हरित क्रांतीची सुरुवात झाली. नंतर इतर अनेक पिकांच्या बाबतीत या तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यात आला. हरित क्रांतीमध्ये जास्त उत्पादन देणारी बियाणे, रासायनिक खते व रासायनिक कीटकनाशके यांचा मोठ्या प्रमाणावर वापर यातील त्रिसूत्रांचा समावेश होतो. संकरिकरण्याच्या तंत्राच्या साह्याने पिकांची हेक्टरी अधिक उत्पादन देणारे संकरित बियाणे तयार करण्यात आली या तंत्रात एखाद्या पिकाच्या दोन किंवा जास्त वाहनांमधील काही महत्त्वाचे गुणधर्म एकत्र आणून त्या पिकाचे नवनवीन नवीन वाण तयार केले जाते या तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर विकारामुळे नंतरच्या काळात भारतातील अन्नधान्याच्या उत्पादनात प्रचंड वाढ झाली सन १९५० च्या दरम्यान ५.२ कोटी मेट्रिक धरणाच्या आसपास असलेले धान्य उत्पादन सन २०१३ मध्ये २६.३ कोटी मेट्रिक टन एवढे वाढले.

भारतातील धान्य गोदामांमध्ये आपती काळासाठी वापरण्यात येणारा अन्नसाठा फोटी मेट्रिक टनाचा वर गेला आहे वाढत्या लोकसंख्येला पुरेल एवढे धान्य भारत देशात आतापर्यंत उत्पादित करू शकला आहे. हरितक्रांतीच्या काळात आलेला दुष्काळ व पूर यांसारख्या नैसर्गिक आपत्तीच्या परिस्थितीवर अन्नासाठी यामुळेच भारत देश मात करू शकता आहे. तसेच भारतामधून मोठ्या प्रमाणात अन्नधान्य निर्यातही केली जात आहे हे सर्व हवे क्रांतीमुळे शक्य झाले आहे.

पुढील तक्ता क्रमांक २.२ मध्ये अन्नधान्य पिकांचे एकूण उत्पादनातील बदल दर्शवला आहे. त्यावरून सर्व साधने पिकांच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात बाद झालेली दिसून येते.

तक्ता क्र. २.२: भारतीय कृषी उत्पादन (लाख टन)

| वर्ष | तांदूळ | गहू | भरडधान्य | एकूण तृणधान्य | डाळी | एकूण अन्नधान्य |
|---|---|---|---|---|---|---|
| 1950-51 | 206 | 65 | 154 | 424 | 84 | 508 |
| 1955-56 | 276 | 88 | 195 | 558 | 110 | 669 |
| 1960-61 | 346 | 110 | 237 | 639 | 127 | 820 |
| 1965-66 | 306 | 104 | 214 | 624 | 99 | 724 |
| 1970-71 | 422 | 238 | 306 | 966 | 118 | 1084 |
| 1975-76 | 487 | 288 | 304 | 1080 | 130 | 1210 |
| 1980-81 | 536 | 363 | 290 | 1190 | 106 | 1296 |
| 1985-86 | 638 | 471 | 262 | 1371 | 134 | 1504 |
| 1990-91 | 743 | 551 | 327 | 1621 | 143 | 1764 |
| 1995-96 | 770 | 621 | 290 | 1681 | 123 | 1804 |
| 2000-01 | 850 | 697 | 311 | 1857 | 111 | 1968 |
| 2005-06 | 918 | 694 | 341 | 1952 | 134 | 2086 |
| 2010-11 | 960 | 869 | 434 | 2263 | 182 | 2445 |
| 2015-16 | 1044 | 923 | 385 | 2352 | 164 | 2516 |
| 2019-20 | 1184 | 1076 | 475 | 2735 | 232 | 2966 |

SBMECO.Dept

संदर्भ : कृषी मंत्रालय आणि शेतकरी कल्याण, भारत सरकार

२.२.२ भारतीय शेतीची अल्प उत्पादकता: कारणे आणि उत्पादकता सुधारण्यासाठी उपाय योजना

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषिप्रधान अर्थव्यवस्था असून देखील जगातील इतर देशांची तुलना करता भारतातील कृषी क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात विकास झालेला आढळत नाही. त्यामुळे भारतीय शेतीची अल्प उत्पादकता आढळते. कृषी क्षेत्रात गुंतलेली लोकसंख्या आणि राष्ट्रीय उत्पन्न यांचा विचार केल्यास भारतातील कृषी क्षेत्राची उत्पादकता स्पष्टपणे समजते.

1991 च्या जनगणनेनुसार ३१.५ कोटी लोकसंख्येपैकी ६४.५ टक्के एवढ्या मोठ्या प्रमाणात लोकसंख्या ही शेतीत काम करत असून देखील याचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाचा केवळ ३२ पण नऊ टक्के होता. दोन हजार बीस एकवीस मध्ये भारतातील ५८ टक्के लोकसंख्या प्राथमिक क्षेत्रात म्हणजेच कृषी क्षेत्र व स्पाच्याशी संबंधित असणाऱ्या क्षेत्रात काम करत होती आणि या वर्षात राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा हा १७.८ टक्के तरून आपल्याला समजते की देशातील मोठ्या प्रमाणातील लोकसंख्या हीच शेती क्षेत्रात काम करत असून देखील त्यांचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा कमी आहे. या संस्थेचे प्रमुख कारण म्हणजे शेतीची उत्पादकता हेच आहे.

१. भात पिकाचा विचार केल्यास जगाची सरासरी प्रति हेक्टरी उत्पादकता ४६७९ किलो प्रतिहेक्टर आहे. भारताची ३८७८ किलो प्रतिहेक्टर, इंडोनेशियाची ५१९१ किलो प्रतिहेक्टर आहे.

२. गहू पिकाचा विचार केल्यास जगाची सरासरी प्रति हेक्टरी उत्पादकता ३४२५ किलो प्रतिहेक्टर आहे. भारताची ३३७१ किलो प्रतिहेक्टर. यु. एस. ए. ची ३२०० किलो प्रतिहेक्टर आहे.

३. मका पिकाचा विचार केल्यास जगाची सरासरी प्रति हेक्टरी उत्पादकता ५९२४ किलो प्रतिहेक्टर आहे. भारताची ३०२४ किलो प्रतिहेक्टर, प्राझीलची ५१०४ किलो प्रतिहेक्टर आहे.

४. डाळ पिकाचा विचार केल्यास जगाची सरासरी प्रति हेक्टरी उत्पादकता ९७४ किलो प्रतिहेक्टर आहे.
भारताची ७३९ किलो प्रतिहेक्टर, कॅनडाची १९५० किलो प्रतिहेक्टर आहे.

५. ऊस पिकाचा विचार केल्यास जगाची सरासरी प्रति हेक्टरी उत्पादकता ७२५९४ किलो प्रतिहेक्टर आहे. भारताची ७९६८३ किलो प्रतिहेक्टर, चीनची ७६३९५ किलो प्रतिहेक्टर आहे.

अशाप्रकारे जागतिक तुलना केल्यास भारताची उत्पादकता अल्प असल्याचे दिसून येते.

भारतीय शेतीची प्रतिहेक्टरी उत्पादकता इतर विकसित व प्रगत राष्ट्रांच्या तुलनेत अतिशय कमी आहे. भारतातील शेतीची उत्पादकता कमी असण्याची काही प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत:

१. लोकसंख्येचा अतिरिक्त भार

भारतात कृषी क्षेत्र हे बहुतांश लोकसंख्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन आहे. स्वातंत्र्यानंतर भारताचे एकूण लोकसंख्येपैकी ७० टक्के लोकसंख्या उदरनिर्वाह आणि रोजगारासाठी कृषी क्षेत्रावर अवलंबून होती. भारतातील लोकसंख्येच्या वाढत्या प्रमाणामुळे उद्योग व सेवा क्षेत्राला संपूर्ण लोकसंख्येसाठी रोजगार निर्मिती करण्याची क्षमता विकसित करणे अद्याप शक्य झालेले नाही. म्हणून आजही बहुतांश लोकसंख्या कृषी व संलग्न क्षेत्रावर अवलंबून असल्यामुळे कृषी लागवडीयोग्य जमिनीवर लोकसंख्येचा अतिरिक्त भार

निर्माण होतो. जमिनीवरील लोकसंख्येचा भार कमी करण्यासाठी सरकारने कृषी क्षेत्राचे सलग्न पशुपालन, मत्स्यव्यवसाय, हस्तकला इत्यादी उद्योगांची स्थापना केलेले आढळून येते.

२. शेतकऱ्यांचे अज्ञान व निरक्षरता

भारतातील बहुतांश शेतकरी हे निरक्षर असल्याने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांवर अज्ञान, अंधश्रद्धा व दैववाद यां भीतीचा पगडा मोठ्या प्रमाणात दिसून येतो. ग्रामीण भागातील शेतकरी शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी सहाय्यकारी ठरवणार या सुधारित तंत्रज्ञानाबद्दल जागरूक नसतो. भारतातील ग्रामीण भागात शेतीविषयक आधुनिक व शास्त्रीय दृष्टिकोन रुजविण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले जात नाहीत. त्यामुळे शेतकल्यांमध्ये जागृती निर्माण होत नाही त्यांना नवनवीन सुविधांचा लाभ घेता येत नाही.

३. कृषी विस्तारासाठी आवश्यक सुविधांचा अभाव

भारतीय शेतीचे उत्पादकता कमी असण्याचे एक कारण म्हणजे पतपुरवठ्याचे अनुपलब्धता, तांत्रिक मार्गदर्शन, कृषी उत्पादनाची विपणन व्यवस्थापन इत्यादी शेतीला सहाय्य करणारे ठरणाऱ्या आवश्यक सुविधांचा अभाव होय. कृषी विस्तारासाठी किंवा शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी शेतीतील कार्य पार पाडण्याकरिता विविध टप्प्यांवर भांडवलाची निर्मिती किंवा पुरेसा पतपुरवठा होणे आवश्यक असते. भारतामध्ये वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थांची संख्या मर्यादित असल्याने सर्व शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळत नाही त्यामुळे शेतीची उत्पादकता कमी राहते.

४. लहान धारण क्षेत्र

भारतीय शेती व्यवसायाच्या वृद्धिमधील लहान आकारमानाच्या धारणा क्षेत्र हा प्रमुख अडथळा आहे. भारतात लागवडीयोग्य सरासरी जमीन धारणेचा कार्बन या अत्यल्प आहे. लागवड योग्य जमीन जाण्याच्या विभाजना तही यामोठ्या प्रमाणात असंतोष दिसून येतो. मोठ्या आकारमानाच्या कार्यक्षेत्र हे काही मूठभर जमीनदार व शेतकऱ्यांच्या हातात एकवटले असल्याचे दिसून येते. भारतात एकूण लागवड योग्य जमिनीपैकी ४९.५९ टक्के क्षेत्र हे २.५ एकर जमीन धारणा क्षेत्राने व्यापलेला असून २० टक्के क्षेत्र हे २.५ ते पाच एकर जमीन धारणा क्षेत्र व्यापलेले आहे. त्या लहान आकारमानाच्या क्षेत्र शेती करून उदरनिर्वाह करणे अशक्य असते. धारण क्षेत्र लहान असल्याने त्या क्षेत्रात नवीन तंत्रज्ञानाच्या वापरावर मर्यादा येतात.

५. आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव

शेतीच्या उत्पादकतेत वाढ करण्यासाठी शेतीशी निगडित आधुनिक उत्पादन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे आवश्यक ठरते. कृषी उत्पादक त्रुटी पडवून आणण्यासाठी संकरित बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, यांत्रिकीकरण इत्यादींचा स्वीकार करणे गरजेचे आहे. मात्र अजूनही भारतातील बहुसंख्य शेतकरी हे जमीन कसण्यासाठी पारंपरिक तंत्राचा व साधनांचा वापर करताना दिसतात. भारतीय शेतीला आधुनिक उत्पादन तंत्राचा भाग भांडवलाची कमतरता व लहान आकारमानाचे धारण क्षेत्र ही प्रमुख कारणे आहेत. भारतामध्ये बहुतांश शेतकऱ्यांना अत्यल्प आर्थिक उत्पन्न मिळते. तसेच भारतातील दरडोई धारण क्षेत्र आकारमानाने खूप लहान आहे.

६. जलसिंचनाच्या सुविधांचा अभाव

स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने पाणी पुरवठ्याच्या बाबतीत परिपूर्णता निर्माण करण्याच्या उद्देशाने अनेक जल प्रकल्प हाती घेतले परंतु तरीसुद्धा भारतातील ६० टक्के क्षेत्र हे पूर्णपणे कोरडवाहू आहे. कोरडवाहू

SBM Eco. Department Rajgurunagar

जमिनीत अधिक व जलसिंचनाच्या अपुऱ्या सुविधा यामुळे शेतीच्या उत्पादनात वाढ करणे शक्य होत नाही, भारतीय शेती व्यवसायाला आजही मुख्यत्वे मान्सूनवर अवलंबून आहे. शेतीच्या उत्पादकतेतील पर्याप्त वाढीसाठी शेतीतील पिकांच्या वाढीच्या विविध टप्प्यांवर जलसिंचनाच्या उपलब्धता हे प्रमुख प्रभावी साधन आहे.

७. भांडवलाची कमतरता

शेती व संलग्न क्षेत्रातील भाषांमध्ये आर्थिक गुंतवणुकीची मोठी आवश्यकता असते. शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, जलसिंचन सुविधा, संकरित बियाणे, कृषी विपणन साठवण या सर्व कृषी एक प्रक्रिया साठी पर्याप्त भांडवल भरणे भारतातील गरीब व अल्पभूधारक शेतकऱ्यांना शक्य होत नाही. कृषी क्षेत्रातील आवश्यक असलेल्या संस्थात्मक पतपुरवठा करणाऱ्या स्थानिक सहकारी बँका वेळेवर व पुरेसा पतपुरवठा करू शकत नाहीत अशी खंत आहे. त्यामुळे भारतीय शेतीच्या कमी उत्पादकतेचे प्रमुख कारणे भांडवलाची कमतरता हे आहे.

८. आधुनिक बी-बीयाणे व खतांची कमतरता

शेतीचे उत्पादन व उत्पादकता वाढविण्यासाठी उत्तम प्रतीचे बियाणे हा एक महत्वपूर्ण साधन आहे. खते, कीटकनाशके, जलसिंचन, आधुनिक परे या यांसारख्या साधना सोबरच उच्च गुणवत्तेचे बियाणे वापरणे आवश्यक असते. स्वातंत्र्योत्तर काळात कृषी संशोधनात अधिक शोध लावले गेल्याने संकरित व सुधारित बियाणांच्या अनेक प्रजाती बाजारात आढळतात.

९. पतपुरवठा व शेतमाल विक्री व्यवस्थेच्या सुविधांचा अभाव

भारतीय शेतकऱ्यांना पतपुरवठा करणाऱ्या संस्था या मर्यादित असल्याने त्यांना मोठ्या प्रमाणात पैशाची गरज भागवली जात नाही त्याचा उत्पादनावर परिणाम होतो. त्यामुळे त्यांच्यात निराशेचे वातावरण तयार होते. तसेच शेतमालाला योग्य किंमत मिळत नसल्याने त्यांना परंपरागत शेतीव्यवसाय करणे भाग पडते.

१०. शेती संशोधनाकडे दुर्लक्ष

भारतामध्ये शेती संशोधनासाठी केला जाणारा खर्च हा फारच कमी आहे. हा खर्च वाढवणे आवश्यक आहे. शेती क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संशोधन करून ते ग्रामीण भागातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. त्याचबरोबर कृषी विद्यापीठे, महाविद्यालय, शेतमालाला दर्जा प्रमाणित करणाऱ्या संस्था यांचे संख्या फारच कमी आहे. अशा संस्थांची स्थापना करून त्यांच्यामार्फत संशोधन करून ते शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे.

भारतीय शेतीची उत्पादकता सुधारण्यासाठी उपाययोजना

१. सामूहिक शेती

भारतामध्ये मोठ्या प्रमाणात अल्पभूधारक व सीमांत शेतकरी आहेत. अशा शेतकऱ्यांना लहान आकाराच्या धारण क्षेत्रात उदरनिर्वाहासाठी आवश्यक पर्यात आर्थिक उत्पन्न मिळत नाही, त्यामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांना लहान आकारमानाच्या धरण क्षेत्रात आधुनिक उत्पादन तंत्राचा अवलंब करणे शक्य होत नाही, अशा लहान अल्पभूधारक शेतकऱ्यांनी एकत्रितपणे सहकाराच्या तत्त्वानुसार सहकारी शेती संस्थांची स्थापना करण्याचा पर्याय अवलंबता येऊ शकतो. सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या शेती संस्थांना सहकारी बँका, व्यापारी बँकाकडून जलसिंचन साधनांसाठी पत मिळवता येऊ शकते, त्यामुळे शेती क्षेत्रातील उत्पादकता वाढण्यास मदत होईल.

ECO Department Rajgurunagar

२. कृषी पतपुरवठा

भारतीय शेती व्यवसाय पुरेशा प्रमाणात भांडवल उपलब्ध नसल्यामुळे शेतीमध्ये आधुनिक उत्पादन तंत्राचा अवलंब आणि शेतीतील यांत्रिकीकरणासाठी गुंतवणूक करण्यास भारतीय शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम नसतात. पूर्वी शेतकऱ्यांना कृषी पुरवठ्यासाठी सावकार, जमीनदार किल्ला नातेवाईक यासारख्या बिगर संस्थात्मक स्रोतांवर अवलबून राहावे लागत असे परंतु भारतात संस्थात्मक मार्गाने पतपुरवठा करण्याचा विचार पुढे आला कृषी पतपुरवठा साठी व्यापारी बँका, सहकारी बँका व प्रादेशिक ग्रामीण बँकामार्फत संस्थात्मक मार्गांनी | पतपुरवठा केला जातो. भारतातील शेतकऱ्यांना अल्प दरांनी व पर्यात प्रमाणात पुरवठा केला जाण्याच्या उद्देशाने भारत सरकारने विविध संस्थांची स्थापना केली आहे.

3. जलसिंचन सुविधा

शेतीची प्रति हेक्टरी उत्पादकता वाढविण्यासाठी शेतीतील पिकांच्या वाढीचा निर्णय या टप्प्यावर जलसिंचन सुविधा उपलब्ध असणे हे प्रमुख प्रभावी कृषि आदान आहे. जलसिंचनाच्या सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी भारत सरकारने जलसिंचन प्रकल्पाच्या विकासाला प्राधान्य दिले आहे. सरकारमार्फत लघु, मध्यम व मोठे जलसिंचन प्रकल्प राबवले जातात, पाणी आडवा पाणी जिरवा यासारखे योजनांद्वारे जलसंधारण करण्याचा प्रयत्न केला गेला, सिंचनाच्या उपलब्धतेमुळे संकरित बी-बियाणे व रासायनिक खतांच्या योग्य वापराने शेतीच्या उत्पादकतेस वाढ पडून येण्यास मदत होते.

४. यांत्रिकीकरणाचा वापर

भारतातील ग्रामीण भागातील शेतकरी आजही परंपरागत शेती व्यवसाय करताना आढळतात. त्यामुळे शेती क्षेत्राचे उत्पादकता कमी राहते. अशा वेळेस योग्य आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास शेतीची उत्पादकता वाढण्यास मदत होत आहे. शेती व्यवसायात पाणी हा अतिशय महत्वाचा घटक आहे आणि याचा वापर अवाजवी व अशास्त्रीय प्रकारे केला जातो. आधुनिक शेती पद्धतीमध्ये पाण्याचा योग्य काटेकोर व शास्त्र शुद्ध पद्धतीने वापरावर भर देणे महत्त्वाचे आहे. यासाठी ठिबक सिंचन, तुषार सिंचन यांचा वापर केल्या जाणे महत्त्वाचे आहे. याच पद्धतीने इतर शेतीचे काम हे आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने केल्यास शेतीची उत्पादकता वाढण्यास मदत होईल.

५. धारणक्षेत्रांच्या एकत्रीकरणाचा कायदा

लहान आकारमानाच्या धारण क्षेत्र व छोटे आणि विभाजित धारण क्षेत्र हे भारतीय शेतीच्या उत्पादकतेत वाढ करण्याच्या मार्गातील प्रमुख आहे. म्हणून शेतीच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी चौथ्या पंचवार्षिक योजनेत शहराच्या आर्थिक याद आणि संतुलित प्रादेशिक विकास व उद्दिष्ट साध्य करण्यासाठी तुकडेबंदी आणि धारणा क्षेत्रांचे एकत्रीकरण करण्यासाठी तुकडे जोड कार्यक्रम हाती घेण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत एकाच शेतकऱ्यांचे अनेक तुकड्यात विरलेलं केलेले व पर आकारमानाने लहान लेकराचे एकत्रीकरण करण्यात आले. लहान क्षेत्राचे एकत्रीकरणामुळे धारण क्षेत्राच्या आकारमानात वाढ होऊन जलसिंचन सुविधा, जमिनीतील पाणी येणे, पायाचे व्यवस्थापन, जमिनीला कुंपण घालण्यात जमिनीचे सपाटीकरण यासारख्या प्रक्रिया करून शेतीची उत्पादकता वाढवणे शक्य होते..

६. रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा प्रभावी वापर

जलसिंचनाच्या पर्याप्त सुविधा उपलब्ध असलेल्या शेतातील पिकासाठी रासायनिक खतांचा जास्त वापर करून शेतीची प्रति हेक्टरी उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयत्न केले जाऊ शकतात. पिकांच्या योग्य

वाढीसाठी पुरेशा प्रमाणात जमिनीला खतपुरवठा करणे आवश्यक असते. शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी सेंद्रिय खते, जैविक खते, रासायनिक खतांचा वापर केला जातो. मात्र हरित क्रांतीनंतर भारताच्या कृषी उत्पादन त्यात रासायनिक खतांचा मोठा प्रभाव पडलेला दिसून येतो. भारतात रासायनिक खते पुरेशा प्रमाणात उपलब्ध व्हावेत म्हणून काही प्रमाणात रासायनिक खतांची आयात केली जाते. भारत सरकार रासायनिक खतांचे उत्पादन वाढविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करतो.

७. सुधारित बी-बियाणांचा पुरवठा

शेतीच्या उत्पादकतेत वाढ घडवून आणण्यासाठी संकरित बियाण्यांचा वापर करणे अधिक उपयुक्त ठरते. या दृष्टीने भारतातील शेतजमिनीचा पर्जन्य हवामान या सर्व घटकांना विचारात घेऊन अधिक उत्पादक ठरू शकणाऱ्या संकरित बियाणांच्या नवीन प्रजातीचा शोध घेण्याचे कार्य देशभरातील कृषी विद्यापीठे आणि कृषी संशोधन संस्थामध्ये संशोधन करून भाग पाडले जात आहे. शेतीच्या प्रति हेक्टरी उत्पादनात वाढ करण्यासाठी संकरित बियाणांचा उत्पादनात वाढ करणे आणि शेतकऱ्यांना अल्प दरात व संकरित बी-बियाण्यांचा पुरवठा करणे, हे शेतीच्या प्रत्येक तर उत्पादनात वाढ घडवून आणण्यासाठी उपयोगी ठरते.

८. सहकारी कृषी पतसंस्था

ग्रामीण भागातील शेतकरी मोठ्या प्रमाणात भांडवल उभारणी करू शकत नाही. म्हणून ग्रामीण भागातील लोकांच्या ठेवी स्वीकारण्यासाठी व त्यांना अल्प मुदतीचे कर्ज देण्यासाठी प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थेची स्थापना केली जाते, या पतसंस्था मार्फत मुख्यत्वे कृषीक्षेत्रासाठी कर्ज दिले. शासनामार्फत सुरू करण्यात आले पिक कर्ज योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना पिकांना तारणाचा स्वरूपात स्वीकारून त्यावर रोख रक्कम किंवा खतांच्या स्वरूपात कर्ज देते. अन्नधान्य व नगदी पिकांसाठी पीक कर्ज योजने मार्फत कर्ज दिले जाते. या योजनांतर्गत कापूस, ऊस, तेलबिया इत्यादी पिकांच्या तारणावर बँकांकडून कर्ज मंजूर केले जातात. सहकारी कृषी पतसंस्थामार्फत देण्यात आलेल्या कर्जाची परतफेड शेतीतून मिळालेल्या उत्पन्नातून केली जाते.

९. शेतमालाची नियंत्रित विक्री व्यवस्था

भारतातील शेती व्यवसायात तयार शेतमालाच्या विक्री व्यवस्थेत अनेक उणिवा दोष आढळून येतात. त्यामुळे शेतीच्या उत्पादकतेत घट होते. शेतमालाच्या विक्री व्यवस्थेत मध्यस्त किंवा दलालांकडून शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यासाठी राज्य सरकार द्वारे प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी कृषी उत्पन्न बाजार समिती मार्फत निर्माण केला जाणारा नियंत्रित बाजारपेठांची स्थापना करण्यावर भर दिला जातो. कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फत बाजारातील शेतमालाचे निश्चित व योग्य दर ठरविले जातात. तसेच दलालांची योग्य दलाली निश्चित केली जाते. मालाचे वजन करण्यासाठी प्रमाणित वजने व मापे अधिनियम कायद्यांतर्गत केवळ सरकारी कायद्याने प्रमाणित केलेली वजने व मापे वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे. शेतीतील उत्पादित मालासाठी आधुनिक साठवणगृह व गोदामे यांची स्थापना केली जाते. या सर्व सुविधांमुळे शेतीची उत्पादकता वाढण्यास मदत होते.

२.३.३. कृषी वित्त पुरवठा: गरज आणि श्रोत

भारतातील शेतीची उत्पादकता कमी आहे. ते वाढवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करायची असेल तर त्यासाठी दोन मार्ग प्रभावी ठरू शकतात एक म्हणजे कृषी वित्त पुरवठा आणि दुसरा म्हणजे कृषी उत्पादित मालाची विक्री, आजच्या काळातील शेती व्यवसाय हा भांडवली स्वरूपाचा झालेला आहे. आधुनिक पद्धतीने शेती करायचे असल्यास वेगळे आधुनिक धान्य खरेदी करावी लागतात, जमिनीत सुधारणा करावी लागते यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवलाची गरज असते. शेतकऱ्यांचे मुळात उत्पन्नच कमी असल्याने ते फारसे बचत करू शकत नाही मचत नसल्याने त्यांच्याकडे भांडवलाचा अभाव राहतो. वित्तपुरवठा करणाऱ्या विविध स्रोतांकडून पुरेसा वेळेवर आणि स्वस्त व्याजदराने भाडवल पुरवठा झाला तर शेतकरी निश्चितपणे फायदा घेऊन उत्पादन आणि आपल्या उत्पन्नात वाढ घडवून आणू शकतात. उत्पन्न यादवण्याचा व त्याचं स्थैर्य निर्माण करण्याचा दुसरा मार्ग म्हणजे विपणन व्यवस्था होईल शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाला योग्य भाव मिळाला तर त्याच्या उत्पन्नात वाढ होते आणि पुढच्या वर्षी उत्पादन वाढीस प्रेरित होतो.

कृषी वित्त पुरवठ्याची गरज:

भारतातील शेती व्यवसायात विविध कारणांसाठी वित्त पुरवठ्याची गरज भासते. ते पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतीलः

१. शेतीचा विकास

शेती उत्पादनासाठी कर्ज घेतले जाते, तेव्हा शेतकरी त्या कर्जामधून आपल्या वर्षभरातील सर्व गरजांची पूर्तता करत असतो. त्यामुळे त्या कर्जाच्या आधारावर शेतीचा विकास होऊ शकत नाही. कारण उत्पादन हाती आल्यानंतर मागील कर्जाची परतफेड करणे, पुढील उपयोगासाठी सोय करणे यासारख्या कामासाठी मिळालेला पैसा खर्च होतो त्यामुळे शेतीच्या विकासासाठी पैसा शिल्लक राहत नाही आणि शेतीचा विकास करण्यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवलाची आवश्यकता असते. अशा वेळेस देशातील वित्तीय पुरवठा करणाऱ्या संस्थानी आवश्यक तेवढा वित्त पुरवठा करणे गरजेचे आहे.

२. अनुत्पादक कार्यासाठी

शेतकऱ्यांना आपल्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी देखील कर्ज घ्यावे लागते. पिकांच्या लागवडी पासून ते पिकांची विक्री होईपर्यंतच्या मधील काळात शेतकऱ्यांना अनेक उपभोग्य कारणासाठी कर्जाची गरज भासते है कर्ज कुटुंबाच्या दैनंदिन गरजा भागवण्यासाठी घेतले जाते. दैनंदिन उपभोग खर्च भागविता धरोबरच काही आकस्मिक खर्च उद्भवतात तो खर्च भागवण्यासाठी ही कर्जाची गरज भासते. विवाह, धार्मिक विधी, रूढी, परंपरा पालन, सण-उत्सव इत्यादी वरील खर्च भागवण्यासाठी कर्ज घेतले जाते. या कर्जातून उत्पादनात वाढ होत नाही यातून कर्जाची परतफेड करणे शक्य नसते. या कर्जाची परतफेड शेती उत्पन्नातून केली जाते म्हणून या कर्जाना अनुत्पादक कर्ज असेही म्हटले जाते.

३. उत्पादन आणि उपभोग

शेतकऱ्यांकडून घेतले जाणारे कर्ज हे केवळ शेतमाल उत्पादनासाठी लागत नाही, तर त्याच्या दैनंदिन गरजा भागवण्यासाठी ही त्यांना पैशाची आवश्यकता असते. अशा वेळेस शेतकऱ्यांकडून दैनंदिन उपयोगासाठी कर्जाची मागणी केली जाते. शेतीमध्ये उत्पादनाच्या एकूण स्वरूपामध्ये त्या चालू असताना दैनंदिन गरजा कशा पूर्ण करायचा हा देखील शेतकऱ्यांसमोर प्रश्न असतो. त्यामुळे शेतकरी उपभोगासाठी

देखील कर्जाची मागणी करत असतात, तसेच अनेक ठिकाणी हंगामानुसार शेती केली जाते अशा वेळेस उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याने शेतकऱ्यांना कर्जाची गरज भासते.

४. आकस्मिक कार्यासाठी

भारतीय शेती ही पूर्णपणे निसर्गावर अवलंबून असल्याने नैसर्गिक आपत्तीचा त्याच्यावर दुष्ट परिणाम होतो. अतिवृष्टी, दुष्काळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांना मोठे नुकसान सहन करावे लागते. पेरणी झाल्यानंतर अतिवृष्टी किंवा पावसाअभावी पीक वाया जाते अशा वेळेस परत पेरणी करण्यासाठी, पिकांवर रोग पडणे, बियाणे खराब होणे, व्यापाऱ्यांचे संप यांसारख्या आकस्मिक परिस्थिती मुळे शेतकरी वर्गाकडून कर्ज घेतले जाते. आकस्मिक परिस्थिती मुळे होणारे नुकसान हे मोठ्या प्रमाणात असते. शेतकरी हे आपल्या उत्पादनातून भरून काढू शकत नाहीत त्यामुळे त्यांना कर्ज घेण्याची गरज भासते.

कृषी वित्तपुरवठ्याचे स्रोत:

कृषिक्षेत्रात वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थांचे दोन वर्गात विभाजन केले जाते बिगर संस्थात्मक स्तरावर आणि संस्थात्मक स्रोत.

अ) बिगर संस्थात्मक स्रोत :

ज्या संस्थांवर भारतीय रिझर्व बँकेचे कुठल्याही प्रकारचे नियंत्रण नाही अशा संस्था कडून घेतलेल्या कर्जाला "बिगर संस्थात्मक कर्ज" असे म्हणतात. या संस्थांमध्ये प्रामुख्याने व्यापारी पतपेढी वाले, सावकार, जमीनदार, नातेवाईक यांचा समावेश होतो. असे लोक शेतकऱ्यांच्या जवळचे असल्याने त्यांच्याकडून विनातारण कर्ज पुरवठा केला जात असे. त्यामुळे शेतकऱ्यांना योग्य वेळेला हवी ती रक्कम मिळण्यास मदत होत असे, या कर्जाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे कर्ज घेण्याच्या उद्देशाची विचारना केली जात नाही. असे कर्ज उत्पादक किंवा अनुत्पादक कार्यासाठी तात्काळ उपलब्ध होत असे. त्याचबरोबर कर्जफेडीसाठी कुठल्याही प्रकारची घाई केली जात नाही. फक्त त्यावर व्याज मिळण्यावर त्यांचा कटाक्ष राहत असे. अशी परिस्थिती असल्याने लोकांना बिगर संस्थात्मक कर्ज घेण्यात जास्त सोयीस्कर वाटत असे. परंतु हा कर्जाचा प्रकार अतिशय भयंकर असा आहे कारण या कर्जाचे व्याजदर हे स्वतः कर्ज देणाऱ्या व्यक्ती ठरवते. त्यावर कुठल्याही प्रकारचे नियंत्रण नसते. तसेच कर्ज देताना अशा संस्था किंवा व्यक्ती कर्ज घेणाराचे जमीन, परदार गहाण ठेवून घेत असे. अशा वित्तपुरवठा करणाऱ्या स्रोतांकडून अनेक गैरव्यवहार केले जातात. कोऱ्या कागदावर अंगठे घेणे, जमीन पाण ठेवताना फसविणे, कमी दराने अधिक पीक खरेदी करणे. कर्जाच्या रकमेतून व्याज कपात करणे इत्यादी पद्धतीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते.

य) संस्थात्मक स्रोत :

संस्थात्मक स्रोताच्या प्रकारांमध्ये शासन सहकारी संस्था, व्यापारी बँका व प्रादेशिक ग्रामीण बँक यांचा समावेश होतो. बिगर संस्थात्मक स्रोतांकडून शेतकयांची होणारी पिळवणूक किंवा फसवणूक कमी करण्या शेतकऱ्यांची यातून पूर्णपणे सुटका करण्यासाठी संस्थात्मक वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थांची स्थापना करण्यात आली. सावकार पद्धतीचे समूळ नष्ट करण्यासाठी आणि ग्रामीण भागातील कर्जाची गरज भागविण्यासाठी सरकार नियंत्रित प्रकारच्या संस्थांची स्थापना करण्यात आली. ग्रामीण लोकांचे जीवनमान उंचावणे आणि त्यांचा विकास करणे या उद्देशाने या संस्थांची स्थापना करण्यात आलेली आहे. संस्थात्मक

मार्गाने कर्जपुरवठा हा बिगर संस्थात्मकच्या किंमतीच्या अगदी कमी दराने केला जातो. कर्जपुरवठा करत असताना त्याचा योग्य उपयोग होत आहे की नाही याची पडताळणी या संस्था करत असतात. त्यामुळे कर्जाचा उत्पादक वापराला चालना मिळून परतफेडीची क्षमता निर्माण होण्यास मदत होते. याशिवाय इतर ठिकाणी उपलब्ध नसणाऱ्या तज्ञ मार्गदर्शन या संस्थांकडून मिळत असते. म्हणजे शेतकऱ्यांचे शोषण कमी करून नफा मिळवणे हा हेतू या संस्थांचा नसतो तर कर्जाच्या दुष्टचक्रातून शेतकरी कसा सुटू शकेल या दृष्टीने कर्ज देणे व मदत करणे या उद्दिष्टांवर या संस्था काम करत असतात.

भारतात संस्थात्मक स्रोतांमध्ये सर्व बँका आणि स्टेट बैंक समूह, रिजर्व बैंक, नाबार्ड आणि ग्रामीण बँका तसेच इतर वित्तीय संस्थांचा समावेश होतो. यांच्यावर सरकारचे पूर्णपणे नियंत्रण असते. भारतामध्ये या संस्थांचे कार्य उत्तरोत्तर विस्तारत गेले असले आणि खाजगी स्रोतांचा कार्य उत्तरोत्तर कमी होत झाले असले तरी कर्जपुरवठा करण्याचा खरा उद्देश अद्याप पूर्ण झालेला नाही.

१. सहकारी बँक वित्त पुरवठा :

१९०४ च्या कायद्यानुसार सहकारी पतपुरवठा भारतात चालू झाला. अल्पकालीन व दीर्घकालीन कर्जपुरवठा करण्यासाठी प्राथमिक सहकारी सोसायट्या आणि दीर्घकालीन कर्ज पुरवठा करण्यासाठी भूविकास बँका असे त्यांची रचना दिसते. या संस्था ग्रामीण भागात सावकाराचे जागा घेतील अशी त्यांच्याकडून अपेक्षा होती परंतु ती अपेक्षा जरी पूर्ण झाली नसली तरी इतर कोणत्याही कर्ज पुरवठा करणाऱ्या संस्था पेक्षा सहकारी संस्था या ग्रामीण भागात खोलपर्यंत विस्तारलेल्या आहेत. भारतात सहकारी संस्थांचे रचना त्रिस्तरीय आढळते. ही रचना एखाद्या पिरॅमिड सारखी असते. या तीनही संस्था परस्परांशी जोडलेल्या असतात. याचा मुख्य फायदा म्हणजे शहरांमधील संशोधने कमी खर्चात खेड्यांपर्यंत पोचवणे शक्य होते, ग्रामीण भागात प्राथमिक सोसायट्या काम करत असल्याने तेथे वित्तपुरवठा याचा अंदाज घेऊन त्या तिथे व्यवस्थितपणे काम करू शकतो. राज्यस्तरीय बँक हे राज्य पातळीवर कार्य करत असले तरी त्याला प्रथमिक सोसायट्यांना जोडण्याचे काम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका करतात. अशातऱ्हेने शिखर बँकेचा खेड्यांची संबंध त्यांचा पूर्ण फायदा खालचा स्थळापर्यंत मिळू शकतो.

(i) प्राथमिक शेती सहकारी संस्था :

प्राथमिक शेती सहकारी संस्थांचा संबंध हा प्रत्यक्ष खेड्यांशी येतो. प्राथमिक शेती सहकारी पतपुरवठा सोसायटी अल्पकालीन आणि दीर्घकालीन कर्ज उपलब्ध करून देतात. सावकारांची स्पर्धा करण्यासाठी ग्रामीण भागात असलेल्या एकमेव संस्था आहेत. कमीत कमी १० व्यक्ती एकत्रित येऊन ते सहकारी सोसायटी स्थापन करू शकतात. यांचे सदस्यत्व खुले असते. प्रारंभी या संस्था असीमित दायित्वाचा तत्वावर स्थापन झाल्या. सभासदांची जबाबदारी स्वतः पुरते मर्यादित न राहता सर्वसमावेशक असली तरी "सर्वांसाठी एक" हे सहकारी तत्त्व अधिक प्रभावीपणे अमलात आणता येते. म्हणून त्यावेळी असीमित दायित्वाला मान्यता मिळाली होती. पुढे हे मत बदलून सीमित दायित्वाचा जास्त प्रसार झाला.

प्राथमिक सहकारी समितीत सर्वोच्च अधिकार असणारे मंडळ म्हणजे सर्वसाधारण सभा असते. या सभेची बैठक सामान्यता वर्षांतून एकदा होते. दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी एक व्यवस्थापन समिती असते, त्याच्यामध्ये पाच ते नऊ सदस्य निर्वाचित केले जातात. यांच्याकडून अध्यक्ष व सचिवाची निवड केली जाते. प्राथमिक समित्यांचे निधी उभारण्याचे कार्य वेगवेगळ्या माध्यमातून होते. भागभांडवल आणि सभासद की हा एक भाग आहे. तर दरवर्षी राखीव निधीमध्ये जाणाऱ्या पैशांतून सुद्धा एकूण निधीत भर पडते.

याशिवाय सभासदांकडून ठेवी स्वीकारण्याचे काम या संस्था करतात त्यामुळे एकूण निधि वाढतो. तसेच मध्यवर्ती सहकारी बँक आणि सरकारकडून मिळणारे कर्ज हे निधीत भर टाकण्याचे हे एक महत्त्वाचे साधन आहे.

(ii) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका :

जिल्हा मध्यवर्ती बँकांची कार्य हे दोन पद्धतीने गठीत झालेले दिसते. एक पद्धतीनुसार जिल्हा मध्यवर्ती बँकेचे सभासदत्व केवळ प्राथमिक समित्यांना दिले जाते तर दुसऱ्या पद्धतीमध्ये व्यक्तींना तसेच प्राथमिक संस्थांनाही सभासद करून घेतले जाते. पद्धत कोणतीही असली तरी एका जिल्ह्यातील किंवा काही तालुक्यांमध्ये संस्थांचा संघ असे या बँकेचे स्वरूप असते, भागभांडवल ठेवी शिखर बँक व सरकार यांच्याकडून मिळणारे कर्ज आणि अनुदान या मार्गाने जिल्हा मध्यवर्ती बँकेचा निधी तयार होतो. व्यवस्थापनासाठी एक संचालक मंडळ नियुक्त केलेले असते आणि त्यामध्ये १२ ते १५ संचालक असतात. या बँकेचे मुख्य कार्य म्हणजे त्यांनी समित्यांना वित्त पुरवठा करणाऱ्या बँकेचे कार्यकर्त्यांनी प्राथमिक सहकारी संस्थांच्या कार्यात सारखेपणा आणि त्यांच्याशी नेहमी संपर्क ठेवणे त्यांच्या कार्याची तपासणी करणे, त्यांच्या साधनांचा गुंतवणूक करण्यास मदत करणे इत्यादी कामे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक करत असते.

(iii) राज्य सहकारी बँक :

सहकारी कर्जपुरवठ्याच्या उच्चस्थानी असणारी संस्था म्हणजे राज्य सहकारी बँक होय, या बँकेचे सभासदत्व • मध्यवर्ती सहकारी बँक आणि शिखर बँक यांचे प्रत्यक्ष संबंध असणाऱ्या प्राथमिक सहकारी पतसंस्थांना मिळते. काही राज्यांनी व्यक्तींना सुद्धा शिखर बँकेचे सदस्यत्व देऊ केले आहे परंतु अशी स्थिती फारशी आढळत नाही.राज्य सरकार या बँकाचे भाग धारण करते. या बँकेच्या रचनेत सर्वसाधारण सभेला सर्वोच्च स्थान असते. दैनंदिन कामकाज पाहण्याचा अधिकार संचालक मंडळ असतात आणि त्यातील काही संचालक राज्य सरकार नियुक्ता करते. शिखर बँकेच्या निधीचे मुख्य घटक म्हणजे भागभांडवल, राखीव निधि, सभासदांच्या व इतरांच्या ठेवी, राज्य सरकार, रिजर्व बँक, स्टेट बँकेकडून मिळालेले कर्ज आणि राज्य सरकारचे प्रत्यक्ष मदत हे असतात मध्यवर्ती बँकांच्या माध्यमातून खेड्यामध्ये कर्जपुरवठा करणे हे त्यांचे मुख्य काम आहे.

(iv) भूविकास बँका :

भूविकास बँकांना भूतारण बँका असे संबोधले जात असे. ग्रामीण क्षेत्रात कर्जपुरवठा करण्याच्या उद्देशाने या बँकांचे अस्तित्व निर्माण झाले. भारतात सर्वत्र भूविकास बँकांची द्विस्तरीय रचना रूढ झाली आहे परंतु हे स्तर सगळीकडे सारखे नाहीत. सर्व राज्यांमध्ये शिखर संस्था म्हणून मध्यवर्ती भूविकास बँक कार्य करते. काही राज्यांमध्ये द्वितीय स्तरावर प्राथमिक भूविकास बँका आहेत. त्यांचे कार्य प्रामुख्याने जिल्हा किंवा तालुका स्तरावर चालते. काही राज्यांमध्ये जिल्हा मध्यवर्ती बँका आपल्या शाखांच्या माध्यमातून कर्ज देण्याचे कार्य करतात. त्यापैकी पहिली पद्धत जास्त प्रचलित आहे. या बँकांचा कारभार संचालक मंडळाच्या हाती असून त्यात सात ते नऊ संचालक असतात.

२. व्यापारी बँका :

कृषी वित्त पुरवठा व व्यापारी बँकाची भूमिका शहरी वातावरणाशी आणि गरजाशी जास्त संबंधित असल्याचे आपल्याला दिसते, व्यापारी बँकांचा विस्तार हा ग्रामीण भागात जास्त झालेला नाही. व्यापारी

बँकाचे ग्रामीण क्षेत्रातील आगमन शहरी क्षेत्राशी तुलना करता बरेच नवीन आहे व ग्राहकांचा ग्रामीण भागातील वाटा अत्यंत नगण्य होता. त्यामुळे सामाजिक बैंकिंग ही संकल्पना रूढ झाल्यापासून या परिस्थितीत बराच फरक पडला आहे. आता ग्रामीण कर्जपुरवठा करणाऱ्या एक महत्त्वपूर्ण स्रोत म्हणून त्याचा उल्लेख केला जातो.

३. भारतीय स्टेट बँक :

भारतीय स्टेट बैंक व्यापारी बँक असतात तिच्या कार्यात बराच फरक आहे, म्हणून स्टेट बँकेची शेती कर्ज पुरवठ्याची भूमिका अभ्यासणे आवश्यक आहे. ग्रामीण पतपुरवठ्याची गरज प्रचंड असताना या क्षेत्रात केवळ सहकारी बँका संस्थात्मक कार्य करत होत्या, त्यांच्या कार्यात सुद्धा अनेक दोष होते. त्यामुळे ग्रामीण पतपुरवठा प्रश्न सोडवण्यासाठी अखिल भारतीय ग्रामीण पहाणी समितीने ज्या महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या त्यातून एक सूचना म्हणजे स्टेट बँकेची स्थापना करावी होती. त्यातून आधीच्या इम्पेरियल बँक ऑफ इंडिया ने राष्ट्रीयीकरण करून १ जुलै १९५५ रोजी स्टेट बँक ऑफ इंडिया ची स्थापना करण्यात आली.

४. प्रादेशिक ग्रामीण बँका

भारतात प्रादेशिक ग्रामीण बँकांची सुरुवात १९७५ पासून झाली. ज्या ग्रामीण क्षेत्रात बँकांच्या सोवी पोहोचलेल्या नाहीत अशा ठिकाणी ते उपलब्ध करून देणे असा मुख्य उद्देश या बँकाच्या स्थापनेमागे होता. त्यामुळे ग्रामीण जनता सावकारी पिंजऱ्यातून मुक्त होऊन ग्रामीण भागातील ठेवी उत्पादक कामासाठी आकर्षित येतील अशी अपेक्षा होती. मोठ्या व्यापारी बँका या प्रादेशिक ग्रामीण बँकांना प्रयोजित करत असल्याने त्या एक प्रकारे व्यापारी बँकाच आहे. फरक इतकाच की, त्यांचे क्षेत्र एक विशिष्ट जिल्हा किंवा काही थोड्या जिल्हापुरते सीमित होते.. प्रादेशिक ग्रामीण बँका या शेतकरी, कारागीर, लघुउद्योग यांना कर्ज देण्याचे काम करतात, तसेच दर सवलतीचा असती.

५. राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक/ नाबार्ड :

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय शेतीला कर्जपुरवठा करण्याच्या कामात रिझर्व बँकेने महत्वपूर्ण भूमिका बजावलेली 'आहे. राजस्थानी सहकारी बँक आणि विकास संस्था यांच्यामार्फत रिझर्व बँकेने शेतीला अल्प मध्यम व दीर्घकालीन कर्ज उपलब्ध करून दिले आहेत त्या दृष्टीने कृषी विभाग ग्रामीण योजना मोफत शाखा तसेच कृषी पुनर वित्त व विकास महामंडळ हे कार्यरत होते तथापि पुढील काळात शेतीच्या विकासासाठी कल्पना अधिक व्यापक करून ती ग्रामीण विकासाच्या कल्पना एकत्रित करण्यात आणि याबद्दल बदललेल्या संदर्भात राष्ट्रीय स्तरावर एखादी स्वतंत्र बैंक स्थापनेची गरज निर्माण झाली यानुसार शिवरामन समितीच्या शिफारसी नुसार बँकेची स्थापना करण्यात आली राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक/ नाबार्ड १२ जुलै १९८० रोजी अस्तित्वात आली.

नाबार्डचे कार्य:

नाबार्डचे कार्य पुढील प्रमाणे आहेत:

1. ग्रामीण वित्त पुरवठा करण्यासाठी शिखर बँकेची भूमिका पार पाडणे.

२. कृषी वित्तपुरवठा माध्यमातून ग्रामीण सहकारी क्षेत्रांच्या कार्यावर लक्ष ठेवणे

३.राज्य सहकारी बँका प्रादेशिक ग्रामीण बँका भूविकास बँका याना मध्यम व दीर्घ कालीन वित्तपुरवठा उपलब्ध करून देणे.

४.ग्रामीण आणि कृषी विकासासाठी संशोधन कार्यात प्रोत्साहन करण्यासाठी निधी उपलब्ध करून देणे. ५.प्राथमिक सहकारी पतसंस्था सोडून प्रादेशिक ग्रामीण बँका आणि राज्य सहकारी बँका यांच्या कार्यावर देखरेख व त्यांची तपासणी करणे.
६. लघुउद्योग अत्यंत लघु उद्योग कुटिरोद्योग ग्रामोद्योग त्याची विकासासाठी अप्रत्यक्षपणे मदत करणे. ७. केंद्र आणि राज्य सरकार योजना आयोगाने तर अखिल भारतीय व राज्य पातळीवरील संस्था यांच्यात समन्वय निर्माण करणे.

२.२.४. कृषी विपणनः दोष आणि दोष कमी करण्यासाठी उपाय योजना
शेतमाल विक्री व्यवस्था किंवा विपणन ही अशी प्रक्रिया आहे की ज्यामध्ये उत्पादक व ग्राहक यांना एकत्र आणले जाते. शेतमाल विक्री व्यवस्थेद्वारे शेतमालाचे उत्पादन व ग्राहक यांना एकत्र आणले जाते. कार्यक्षम व्यवस्था आर्थिक व्यवहार वाढविण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे भूमिका बजावते. तसेच उत्पादन झालेला उत्पादनाचा आर्थिक दृष्टीने चांगला वापर होण्याच्या दृष्टीने अतिशय कार्यक्षम विक्री व्यवस्थेची गरज असते. उपलब्ध होणारा विक्रिय वाढावा ग्राहकांपर्यंत पोहोचविणे यांच्याबाबतीत बाजार व्यवस्थेचा विचार करावा लागतो. बाजार व्यवस्था योग्य प्रकारच्या असणे, विक्री वाढविण्यासाठी व एकूणच शेती विकासासाठी आवश्यक असते. नाशवंत स्वरूपाचा शेतमाल बाजारात नेला जाऊन तो ग्राहकापर्यंत पोहोचविणे आवश्यक असते. शेतमालाच्या बाजारात ठोक व्यापारी, किरकोळ व्यापारी, दलाल, अडते वगैरेंची साखळी असते व अशा मध्यस्थांमार्फत शेतकऱ्याला आपला माल विकावा लागतो. शेती बाजारात धान्य, डाळी यांसारखी खरेदी करणारे उपभोक्ते, औद्योगिक कच्चा माल खरेदी करणारे, उत्पादन निर्यात करणारे व्यापारी असे तीन प्रकारचे ग्राहक असतात. भारतीय अर्थव्यवस्थेत शेती उत्पादनाचा वाटा मोठा असल्याने शेतकरी बाजार हा सर्वांत मोठा व सर्व देशभर कानाकोपऱ्यात पसरलेल्या दिसून येतो. ग्राहक व उत्पादक यांना एकत्रित आणण्याचे काम एका साखळी मार्फत केले जाते. शेतमाल गोळा करणे, वाहतूक व्यवस्था, साठवण्यास, पतपुरवठा वगैरे पटकाचा समावेश होतो...

कृषी विपणनाचे दोष
पुढील मुद्द्यांच्या आधारे भारतातील कृषी विक्री व्यवस्थेतील दोष स्पष्ट करता येतील
१. साठवणूक सोयींचा अभाव
भारतातील शेतमाल विक्री व्यवस्थेचा बाबतीतील सर्वात महत्त्वाची समस्या म्हणजे भारतीय शेतकऱ्यांकडे आपल्या मालाची शास्त्रशुद्धपणे साठवणूक करण्यासाठी आवश्यक सोयी उपलब्ध नाहीत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतीमालाची नासाडी होते.
२. मध्यस्थांचे मोठी साखळी
शेतमाल बाजार व्यवस्थेत दलाल, अडते, व्यापारी, किरकोळ व्यापारी अशी मध्यस्थांचे मोठी साखळी असते. त्यामुळे उपभोक्काने शेतमालावर खर्च केलेल्या रकमेपैकी फारच कमी रक्कम प्रत्यक्षात शेतकऱ्यांना मिळते.
३. प्रतीक्षा क्षमतेचा अभाव

अनेक शेतकरी हे गरीब व कर्जबाजारी असल्याने शेतमालाचे उत्पादन झाल्यावर तो माल लगेच बाजारात आणावा लागतो. शेत मालाला योग्य किंमत मिळेपर्यंत प्रतीक्षा करणे त्यांना शक्य नसते. त्यामुळे हंगामात शेतीमालाचा पुरवठा एकदम वाढून किमती वाढतात व त्यातून शेतकऱ्यांचे नुकसान होते.

४. वाहतूक सोपींचा अभाव

अजूनही अनेक खेड्यांना बाजारपेठांचे गावे व शहरे यांना जोडणारे पक्के रस्ते नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या आयुष्यात मालाची विक्री गावातील किंवा स्थानिक आठवडे बाजारात करावी लागते. त्यामुळे त्यांना आपल्या मालाची योग्य किंमत मिळत नाही.

५. बाजार विषयक माहितीचा अभाव

निरनिराळ्या बाजारात शेतमालाच्या किमती काय आहेत या याविषयी शेतकऱ्यांना माहीत नसते. मोठ्या प्रमाणात शेतकरीवर्ग हा ग्रामीण भागातील असल्याने त्यांच्यात तेवढी जागृकता नसते व त्यांच्या अशा अज्ञानाचा फायदा घेऊन व्यापारी कमी भावाने शेतमालाची खरेदी करतात.

६. प्रमाणीकरण व प्रतवारी यांचा अभाव

विविध प्रकारचे शेतमालाची प्रतवारी करण्याऐवजी चांगल्या व वाईट मालाची भेसळ केली जाते. अशा चांगल्या व बाईट मालाच्या भेसळ बरोबरच इतर वस्तूंची शेत मालात भेसळ केली जाते त्यामुळे शेतमालाला योग्य भाव मिळत नाही.

७. दलाल व व्यापाऱ्यांकडून फसवणूक दलाल हे शेतकरी व्यापारी यांच्यामधील मध्यस्थ म्हणून काम करतात. त्याचबरोबर दलाल व व्यापारी हे दोघेही संगनमताने गरीब अशिक्षित शेतकऱ्यांची फसवणूक करतात. शेतकऱ्यांचा माल कमी किमतीला खरेदी करतात. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची योग्य किंमत मिळत नाही. या प्रकारात त्यांची लुबाडणूक होते.

८. विविध प्रकारचे आकार

शेतकयांनी बाजारात शेतमाल घेतल्यानंतर हमाली, तोलाई, धर्मदाय निधी, बाजार सेस वगैरे विविध प्रकारच्या रकमा वजा करून राहिलेली रक्कम शेतकऱ्यांना दिली जाते. त्यामुळे शेतमालाला कमी किंमत देऊन त्यांचे
नुकसान होते..

कृषी विपणनातील दोष कमी करण्यासाठीच्या उपाययोजना

देशाचा विकास घडवून आणायचा असेल तर कृषी क्षेत्राचा विकास करणे अतिशय महत्त्वाचे आहे. कारण कृषी क्षेत्रावर उद्योगधंदे व सेवा क्षेत्र अवलंबून असते. कृषी क्षेत्राच्या विकासातील सर्वात मोठा अडथळा म्हणजे शेतमालाची विक्री व्यवस्था होय. शेतमालाच्या विक्री व्यवस्थेतील दोष दूर करण्यासाठी पुढील उपाय योजना रामवता येतील.

1. किमतीचे स्थिरीकरण

शेतमालाच्या खरेदीदाराच्या दृष्टीने व शेतकल्याच्या दृष्टीने शेतमालाच्या किमतीच्या स्थिरीकरण आवश्यक ठरते. सरकार शेती किमती आयोगाच्या मदतीने प्रमुख पिकांच्या किमती घोषित करण्याचे काम करते. तसेच कमी स्थिर राहण्यासाठी स्वत:जवळ शेत मालाचा साठा बाळगून खरेदी विक्रीची जबाबदारी सरकार घेते. त्यामुळे किमती स्थिर राहण्यास मदत होते.

२. वाहतुकीच्या सोयीत वाट

शेतमालाचे विक्री व्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्यासाठी कार्यक्षम वाहतूक व्यवस्था आवश्यक आहे. त्यासाठी वर्षभर वापरता येईल असे रस्ते, रेल्वे व जलमार्ग आवश्यक ठरतात. नियोजन काळात वाहतुकीच्या सोयी वाढ करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात आले. त्या प्रयत्नात काही प्रमाणात वाहतूक व्यवस्थेत सुधारणा घडून आली आली. मात्र गरजेच्या मानाने वाहतुकीची व्यवस्था अजूनही अपुरी आहे.

३. कर्जपुरवठ्याची उपलब्धता

शेतकयांचे प्रतीक्षा क्षमता वाढविण्यासाठी व जबरदस्तीने शेतमालाची विक्री करावी लागल्याने होणारे नुकसान टाळण्यासाठी त्यांना पुरेसा सुलभ व स्वस्त दराने कर्जपुरवठा व्हावा या दृष्टीने शासनाने प्रयत्न केलेले आहेत. शासनाने शेतकऱ्यांच्या प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांच्या प्रसारास प्रोत्साहन दिले आहे. तसेच व्यापारी बँकांच्या शाखा मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागात सुरू झाल्या आहेत. या बँकांकडून कर्ज वितरणात शेती क्षेत्रास प्राधान्य दिले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांना उपलब्ध होणाऱ्या कर्जावाढ झाली आहे.

४. प्रमाणित वजन मापांचा वापर

चुकीचा आणि अप्रमाणित वजन मापे वापरून शेतकऱ्यांची केली जाणारी पिळवणूक थांबविण्यासाठी प्रमाणित वजन मापांचा वापर करणे सक्तीचे केले. त्यामुळे खोट्या वजन मापनाच्या वापरातून शेतकऱ्यांची केली जाणारी फसवणूक दूर होण्यास मदत झाली.

५. बाजार विषयक माहितीचे प्रसारण

भारतातील शेतमाल विक्री व्यवस्थेच्या बाबतीतील आणखी एक महत्त्वाची समस्या म्हणजे शेतकऱ्यांना बाजारातील विविध शेतमालाच्या किमती व त्यांचे आवक यांची माहिती योग्य प्रकारे होत नाही. बाजार विषयक माहिती शेतकऱ्यांना मिळावा यासाठी सरकारने प्रयत्न केले आहेत. वृत्तपत्रे, रेडिओ यांसारख्या माध्यमांद्वारे त्वरित शेतमालाची आवक व किमतींची माहिती उपलब्ध करून दिली जाते. त्यामुळे वेगवेगळ्या बाजारात शेतमालाच्या किंमती काय आहेत याची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोचवणे शक्य होते.

६. गोदामांच्या सोयीत वाढ

साठवणुकीच्या आधुनिक सोयी सहभागी होणारे शेतीमालाची नासाडी थांबविण्यासाठी शेतकऱ्यांना अधिकाधिक प्रमाणात गोदामांची सोय उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने केंद्र तसेच राज्य सरकारने प्रयत्न केले आहेत. गोदामांच्या संख्येत वाढ करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय पातळीवर मध्यवर्ती वखार महामंडळ व राज्य पातळीवर राज्य वखार महामंडळ यांची स्थापना करण्यात आली. १९६० मध्ये गोदामांची संख्या ४० होती व साठवण क्षमता ०.१ दशलक्ष टन होते. १९९३ ९४ मध्ये सार्वजनिक क्षेत्रातील साठवणूक क्षमता ३२.२ दशलक्ष टन होती. तर सहकारी क्षेत्रातील साठवणक्षमता १९९५-९६ मध्ये १३.५ दशलक्ष टन होते. देशातील प्राथमिक सहकारी संस्था व सहकारी विपणन संस्था यांच्याकडे स्वतः चे गोदामे आहेत.

७. नियंत्रित बाजाराची स्थापना

शेतमालाच्या खरेदी-विक्रीत एल्गार प्रकार दूर करून शेतकऱ्यांना त्यांच्या मालाचा योग्य मोबदला मिळवून देणे हा नियंत्रित बाजाराच्या स्थापनेमागील महत्त्वाचा उद्देश आहे. नियंत्रित बाजाराची स्थापना कायद्यानुसार केली जाते. नियंत्रित बाजाराचे व्यवस्थापन शासनाने स्थापन केलेला बाजार समिती मार्फत केले जाते.

बाजार समिती प्रमुख व्यापारी शेतकरी अडते, स्थानिक संस्था, सहकारी बिक्री संस्था आणि सरकार यांचे प्रतिनिधी असतात. बाजार समितीकडून खरेदी-विक्रीचे कामे केली जातात.

८. प्रतवारी व प्रमाणीकरण

प्रतवारी मुळे मालाची भेसळ रोखता येते. तसेच दर्जा नियंत्रित होते. निर्यात व्यापारात प्रतवारी करून दर्जा प्रमाणित करणे विशेष महत्वाचे असते. प्रतवारी व प्रमाणीकरण या क्षेत्रात काही प्रमाणात प्रगती झालेली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात शेतमालाची प्रतवारी व प्रमाणीकरण करण्याच्या हेतूने सरकारने १६ प्रयोगशाळा व ५६० दर्जा ठरवून देणारी केंद्र स्थापन केले आहे. त्यामुळे प्रतवारी व प्रमाणीकरण करण्याचा सुविधेत वाढ झाली आहे.

९. तपासणी, संशोधन आणि प्रशिक्षण

विक्री व तपासणी संचालनालयातर्फे देशभर प्रमुख शेतमालाची तपासणी केली जाते. तसेच शेती मालाच्या विक्रीबाबतच्या विविध अंगांच्या संशोधन केले जाते.

२.२.५. नवीन कृषी कायदा, २०२०

देशात कृषी क्षेत्रात बदल घडवून आणून त्याचा विकास करण्यासाठी आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याच्या उद्देशाने १४ सप्टेंबर २०२० रोजी लोकसभेत तीन विधेयके सादर करण्यात आलेले हे विधेयक १५ जून २०२० रोजी जारी केलेला अनेक देशांच्या जागी लागू केली जातील.

३ कायदे

१. कृषी उत्पादन व व्यापार आणि वाणिज्य (प्रोत्साहन आणि सहाय्य) कायदा, २०२० (मूळ कायदा २००४).

२. शेतकरी (सबलीकरण आणि संरक्षण) हमीभाव करार आणि कृषी सेवा कायदा, २०२०.

३. अत्यावश्यक सुविधा (सुधारणा) कायदा, २०२० ( मुळ कायदा १९५५)

१. कृषी उत्पादन व व्यापार आणि वाणिज्य (प्रोत्साहन आणि सहाय्य) कायदा २०२० कायदा २००४

उद्देश :

(i) शेतकऱ्यांना आणि व्यापाऱ्यांना विक्री आणि खरेदी साठी निवडीचे स्वातंत्र्य उपलब्ध करून देणे व योग्य दर पारदर्शकता आणि अडथळयाविरहित राज्यांतर्गत आणि आंतरराज्यीय व्यापार आणि उद्योग, बाजारपेठांच्या बाहेर किंवा विविध राज्य कृषी उत्पादन बाजार या कायद्यांनी अधिसूचित केलेल्या अभिमत बाजारपेठाच्या ठिकाणी तसेच इलेक्ट्रॉनिक पद्धतीने व्यापार सुलभ करणे

(ii) विपणन आणि वाहतूक खर्च कमी करून शेतकऱ्यांना अधिक चांगला भाव मिळवून देणे.

या कायद्यातील प्रमुख तरतुदी:

(1) शेतकरी आपला शेतमाल देशाच्या कोणत्याही भागात नेऊन त्याची विक्री करू शकतात. ऑनलाईन विक्री सुद्धा करू शकतात.

(ii) कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या बाहेर शेतमालाची विक्री करण्यात आल्यास राज्य सरकार बाजार शुल्क, मेस किया लेव्ही आकारू शकणार नाही.

(iii) या व्यवस्थेअंतर्गत शेतकऱ्यांवर कोणताही अधिभार व उपकर आकारला जाणार नाही

(iv) शेतकयांसाठी स्वतंत्र 'तक्रार निवारण यंत्रणा उभारण्यात येईल
(v) शेतमालाच्या वापरासाठी कोणताही परवाना बंधनकारक नसेल तर पैन कार्ड असलेली कोणतीही व्यक्ती थेट शेतकऱ्याकडून शेतमाल खरेदी करू शकेल.

या कायद्यातील तरतुदींमुळे होणारे लाभ
नवीन कायद्यामुळे शेतकऱ्यांना व व्यापाऱ्यांना कृषी उत्पादनाच्या खरेदी-विक्रीचे स्वातंत्र्य मिळेल व अडथळा मुक्त आंतरराज्य व्यापाराला चालना मिळेल. शेतकऱ्यांचा विपणन खर्च कमी होईल आणि शेतमालाला चांगला भाव मिळून उत्पादकता वाढण्यास मदत होईल.

२. शेतकरी (सबलीकरण आणि संरक्षण) हमीभाव करार आणि कृषी सेवा कायदा, २०२०
या कायद्याला कंत्राटी करार शेतीविषयक असे म्हटले जाते.
भारतातील शेती क्षेत्राच्या मुख्य समस्या म्हणजे भारतीय शेतीमध्ये गुंतवणूक न येणे ही आहे त्यासाठी हा कायदा एक प्रकारची व्यवस्था निर्माण करतो.
कायद्यातील प्रमुख तरतुदी:
(i) शेतकऱ्यांना आपल्या पिकासाठी पाऊक विक्रेते, कृषिमाल प्रक्रिया उद्योग व उद्योजक किंवा कंपन्या यांच्याशी करार करता येईल.
(ii) या कराराद्वारे शेतीमालाची किंमत निश्चित करता येईल.
(iii) ५ हेक्टर पेक्षा कमी जमीन धारणा असलेल्या शेतकऱ्यांना या कंत्राटचा किंवा करारांचा फायदा होईल.
(iv) बाजारपेठेतल्या अस्थिरतेची जोखीम शेतकल्यांना न राहता त्यांच्या कंत्राटदारांवर असेल.
या कायद्यातील तरतुदीमुळे होणारे लाभः

(i) नवीन कायद्यामुळे शेतकऱ्यांना वेगवेगळ्या घटकांशी स्वतंत्रपणे व्यवहार करता येईल.
(ii) शेतकऱ्यांची बाजारपेठेच्या अनिश्चितेविषयीची जोखीम कमी होईल आणि त्यांना आधुनिक तंत्रज्ञान वापरता येईल.
(iii) शेतकऱ्यांचा विपणन खर्च कमी होईल आणि शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होईल
(iv) शेतकरी थेट विपणन क्षेत्रात उतरत असल्याने शेतकरी आणि ग्राहक यांच्यातील मध्यस्थ यांचे उच्चाटन होऊन शेतकऱ्यांना आपल्या शेतमालाची पूर्ण किंमत मिळेल.
(v) हा कायदा राष्ट्रीय व जागतिक बाजारपेठांमध्ये भारतीय शेतीच्या उत्पादनाची पुरवठा साखळी निर्माण करण्यासाठी तसेच खाजगी क्षेत्राची गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी व कृषी पायाभूत सुविधा करिता लाभदायक ठरेल.
(vi) शेतकऱ्यांना जमीन विक्री करण्यावर, जमिनीपासून भाडे मिळवण्यावर किंवा जमीन गहाण ठेवण्यावर बंदी आहे. यासाठी काही वाद निर्माण झाल्यास शेतकऱ्यांना निश्चित कालमर्यादित न्याय मिळविण्यासाठी प्रभावी तक्रार निवारण यंत्रणा या विधेयकाद्वारे पुरवण्यात येईल.

३. अत्यावश्यक सुविधा (सुधारणा) कायदा २०२०- (मुळ कायदा १९५५)
उद्देश ::
(i) शेतकरीच विपणन क्षेत्रात उतरत असल्यामुळे शेतकरी आणि ग्राहक यांच्यामध्ये मध्यस्थांचे उच्चाटन होऊन शेतकऱ्यांना आपल्या शेतमालाचे पूर्ण किंमत मिळेल.
कडधान्य, डाळी, तेलबिया, खाद्यतेल, कांदे आणि बटाटे यांसारख्या वस्तू अत्यावश्यक वस्तू सेवा कायद्यातून वगळण्यात आल्या.
(ii) या कायद्यामुळे शीतगृहातील, तसेच धान्य पुरवठा साखळीतील आधुनिकीकरणाला चालना मिळेल. याचे फायदे शेतकऱ्यांना तसेच ग्राहकांना होऊन वस्तूंच्या किमती स्थिर राहतील.
(iii) धान्य उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण आणि पुरवठा या बाबींचे स्वातंत्र्य मिळाल्यास त्यांचा अर्धव्यवस्थेवर चांगला परिणाम होईल आणि त्यामुळे कृषी क्षेत्रात थेट परकीय गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळेल. यामुळे शीतगृह किंवा अन्नधान्य पुरवठ्याची सुधारित व्यवस्था या गोष्टींना चालना मिळेल.
(iv) युद्ध, दुष्काळ किंवा इतर नैसर्गिक आपत्ती अशा परिस्थितीत भाववाढ, धान्य पुरवठ्यासंबंधी नियंत्रण आणले जाईल. मात्र, संबंधितांनी मूल्य साखळीत केलेली गुंतवणूक आणि निर्यातीसाठी नोंदवलेली मागणी यांना व असाधारण परिस्थितीतही शेतमालाचा यस्तूंचा साठा करण्याची मुभा असेल, यामुळे या क्षेत्रातील खासगी किंवा परकीय गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळेल.

२.२.६. सेंद्रिय शेती आणि करार शेती: अर्थ आणि फायदे
सेंद्रिय शेती
भारत हे कृषिप्रधान देश असल्याने भारतामध्ये शेती क्षेत्रास अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. प्राचीन काळापासून ते आत्तापर्यंत भारतातील मोठ्या प्रमाणात लोक रोजगारासाठी शेतीवर अवलंबून असलेले दिसतात, शेती हा अर्थव्यवस्थेच्या विकासाचा पाया आहे. शेती क्षेत्राचा विकास झाल्यास त्याच्या अर्थव्यवस्थेचा विकास होतो. कारण उद्योगधंदे व सेवा क्षेत्र हे शेतीवर अवलंबून असते. शेती करण्याच्या बन शेती, नैसर्गिक शेती, पारंपारिक शेती, मिश्र शेती, जैविक शेती, रासायनिक शेती अशा विविध प्रकारच्या पद्धती आढळून येतात. आधुनिक काळात पारंपरिक ज्ञान व नैसर्गिक घटकांवर शेती करण्याच्या पद्धतीला सेंद्रिय शेती पद्धती असे म्हणतात. भारतातील सेंद्रीय शेती ही एक कृषी प्रक्रिया आहे ज्यामध्ये सेंद्रिय खत आणि प्राणी किंवा वनस्पतीच्या कऱ्यापासून मिळणाऱ्या कीटक नियंत्रणाचा वापर केला जातो. रासायनिक कीटकनाशके आणि कृत्रिम खतामुळे होणाऱ्या पर्यावरणाच्या त्रासालाही शेती प्रतिसाद देऊ लागली. ही एक नवीन कृषी प्रणाली आहे.
जी पर्यावरण समतोल दुरुस्त करते देखरेख करते आणि सुधारते, सेंद्रिय शेती पद्धतीत पिकांच्या वाढीसाठी आवश्यक अन्नद्रव्यांची गरज जमिनीतून भागवली जाते उत्पादनवाढीचे उदिष्ट साध्य करताना अन्नद्रव्यांचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. पालापाचोळा जमिनीत कुजवून साग किंवा हिरवळीचे पिके जमिनीत गाडून शेणखत कंपोस्ट खत किंवा गांडूळ खतांचा वापर करून सेंद्रिय शेती
केली जाते.

सेंद्रिय शेतीचे फायदे किंवा वैशिष्ट्ये:

१. शाश्वत दीर्घकाळ शेतीचा विकास साध्य होतो.

२. नैसर्गिक घटकांना हानी न पोहोचवता शेती क्षेत्राचा विकास होती.

३. सर्व लोकाच्या आरोग्याचे रक्षण होते.

४. पीक अवशेष व कंपोस्ट खतांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो.

५. जमिनीशी दीर्घकालीन उत्पादकता टिकून राहण्यास मदत होते.

६. मृदा प्रदूषण प्रतिबंध धूप प्रतिबंधक जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धन केले जाते.

७. रासायनिक खते व कृत्रिम औषधे यांचा वापर केला जात नाही.

करार शेती :

कृषिमालाच्या व्यवस्थेवर जागतिकीकरणाचे परिणाम होत आहेत. कृषी मालाची विक्री व्यवस्था मजबूत करण्यासाठी साठवणूक आणि शेतीमाल प्रक्रिया या सुविधा होने आहे. संपूर्ण जग एक बाजारपेठ बनल्याने मोठी स्पर्धा निर्माण झाली आहे. अशा वेळेस उपभोक्ताना चांगल्या दर्जाचा मालाला किंमत मिळणे गरजेचे आहे. उत्पादकाला चांगला भाव मिळण्यासाठी खरेदीदारांना योग्य प्रतिचा चांगली पकिंग केलेला, चांगली टिकवणक्षमता असलेला माल उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे उत्पादकाला मालाच्या विक्रीसाठी चांगल्या सुविधांचा बाजार, साठवणुकीसाठी गोदामे व शीतगृहे असणे बाजारव्यवस्था अधिक शेतकरी भिमुख असणे ह्या दृष्टिकोनासाठी केंद्र व राज्य सरकारकडून मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले जात असतात. करार शेती म्हणजे उत्पादकांनी प्रयोजक कंपनीबरोबर उत्पादन मिळवण्याआधी पूर्वनिर्धारित किंमत ठरवून उत्पादित माल विक्रीच्या कंपनीबरोबर केलेला लेखी करार होय. यामुळे शेतकऱ्यांचा शेतमाल हा करारात नमूद केल्याप्रमाणे खरेदी केला जातो. करार शेतीला प्रोत्साहन देण्याचा उद्देश म्हणजे शेतकऱ्यासाठी शेती उत्पादकतेमध्ये विकास घडवून आणणे, शेतीमालाला योग्य भाव मिळवून देणे, रोजगार वाढवणे, दर्जेदार शेती मालाचे उत्पादन करणे व शेतीमाल प्रक्रिया संस्थांना दर्जेदार माल मिळविणे, अतिम ग्राहकांना चांगल्या प्रतीचा माल उपलब्ध करून देणे असे अनेक उद्देश कारर शेतीमध्ये आहेत.

करार शेतीचे फायदे :

१. योग्य किमतीची खात्री :

करार शेतीमध्ये उत्पादनाची किमत करार करतेवेळी उत्पादनाच्या अगोदरच ठरवले जात असल्याने मालाला योग्य भाव प्राप्त व्हायला मदत होते. त्यामुळे शेतकल्यांना आपल्या मालाला योग्य किंमत मिळण्याची खात्री असते. करार शेतीमध्ये उत्पादन झाल्यानंतर शेतमालाच्या किमतीमध्ये कुठलाही बदल होत नाही त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा राहतो.

२. आदनांची उपलब्धता:

करार शेतीमध्ये प्रयोजक शेतकऱ्यांना योग्य वेळेला भांडवलाची उपलब्धता, यंत्रे, नवनवीन उपकरणे, बियाणे, तांत्रिक मार्गदर्शन, उत्पादनासाठी प्रशिक्षण इत्यादी पटकांचा पुरवठा केला जातो. तसेच कंपनी शेतमाल विक्री व्यवस्थेसाठी योग्य बाजाराचे निवड करते. त्यामुळे एकूणच शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी होतो.

३. अल्प उत्पादन व विक्री खर्च :
विक्री व्यवस्थेतील मध्यस्थानपासून शेतकऱ्यांची सुटका होते. कृषी आधारांवर शेतकऱ्यांना खर्च करावा लागत नसल्याने सावकार, बँकाकडून कर्ज घेण्याची गरज मोठ्या प्रमाणात राहत नाही. शेतमालाचे जागेवर खरेदी होत असल्याने वाहतूक व सायकिचा खर्च वाचतो.
४. रोजगारात वाढ :
भूमिहीन शेतकऱ्यांना करार शेतीमुळे रोजगार निर्माण होतो. लहान शेतकऱ्यांना आपला शेतमाल विक्रीसाठी मोठी बाजारपेठ निर्माण होते. करार शेतीमधील पीक व्यवस्था श्रमिक प्रधानावर अवलंबून असल्याने रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होण्यास मदत होते.
५. शेती व्यवसायीकरण:
पीक लागवडीपासून ते शेतमाल तयार होईपर्यंत शेतकऱ्यांना खरीदार कंपन्यांचा कडून मार्गदर्शन मिळत असल्याने शेती व्यवसायास बाद होण्यास मदत होते.
६. पायाभूत सुविधांचा विकास :
ग्रामीण भागात रस्ते वाहतूक, साठवणूक गृहे. जलसिंचन सुविधा, संदेश वाहन सुविधा यासारख्या पायाभूत सुविधांचा विकास होण्यास मदत होईल.
७. प्रक्रिया उद्योगांना चालना :
प्रक्रिया उद्योगांना व निर्यातदारांना चांगल्या प्रतीचा कच्चामाल मिळण्याचे खात्री निर्माण होते. त्यातून प्रक्रिया उद्योगांना चालना मिळते.

८. लागवडीखालील क्षेत्रात वाढ
करार शेतीमध्ये जे क्षेत्र पिकाखाली आलेले नाही म्हणजे लागवडीखाली आलेले नसते. असे क्षेत्र लागवडीखाली आणले जाते आणि उत्पादनात वाढ करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांना फायदा होऊन मोठ्या प्रमाणात लागवडीखालील क्षेत्र निर्माण होते.
९. जोखमीची विभागणी
करार शेतीमध्ये शेतकरी व प्रयोजक कंपनी या दोन्ही मध्ये शेतीमधील जोखमीची विभागणी केली जाते. शेतीमध्ये प्रायोजकांच्या पुढाकाराने यांत्रिकीकरण वाढण्यास मदत होते.

SBM EC

**----------XXX—OO—XXX----------**
**----------XXX—OO—XXX----------**
**----------XXX—OO—XXX----------**